महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १०२ वा | दिनांक : १६/०१/२०२५ | वार : गुरूवार

# वाल्मीक कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी



**बीड :** संतोष देशमुख हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मीक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल दाखल झाला असून त्याला आता बीड कोर्टाने ७ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. तसेच सीआयडीने देखील कराडच्या विरोधात मोठा दावा केला आहे. खंडणी प्रकरणात अडथळा ठरत असल्याने कट रचून संतोष देशमुख यांची हत्या केली.

विशेष म्हणजे हत्येच्या दिवशी वाल्मीक कराडने संतोष देशमुख यांना धमकी दिली असल्याचा युक्तिवाद सरकारी वकिलांनी कोर्टात केला. यावर संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

धनंजय देशमुख म्हणाले, न्यायालयीन प्रक्रिया सुरू राहणार आहे. आम्ही तपासासंदर्भात अपडेट घेतली. तपास योग्य दिशेने सुरू आहे. आम्हाला विश्वासात घेतले की योग्य दिशेने तपास सुरू आहे. फोन कॉलचे पुरावे कोर्टात सादर करण्यात आले, यावर बोलताना धनंजय देशमुख म्हणाले, साधारण त्याचवेळेत ही घटना घडली होती. दुपारी सव्वा तीनच्या नंतर ते संध्याकाळी साडेसहा वाजेपर्यंत फोन कॉल झाला. दोन-तीन तासांचा तो कालावधी आहे. योग्य दिशेने तपास आहे. तपास बाकी आहे. त्यामुळे त्या तपासाकडे आपले लक्ष आहे. काय काय कनेक्शन सापडतात ते समोर येईल, असे देशमुख म्हणाले.

पुढे बोलताना धनंजय देशमुख म्हणाले, आपण न्याय मागतोय. न्याय आपण यंत्रणेला मागितला आहे. आपली न्यायाची भूमिका आहे. आपण न्याय मागतोय वकिलाच्या युक्तिवादात जाण्याची गरज नाही. त्यांचे ते काम करतात. आरोपी कोण आहे, सहआरोपी कोण आहे, ज्यांनी हत्या केली त्यांना फाशीची शिक्षा द्या. यावर आपण ठाम आहोत. न्यायालयीन गोष्टींचा भाग असल्यामुळे त्यावर जास्त बोलणे उचित नाही, असेही देशमुख म्हणाले.

# परळीत काय सुरू? मला फारशी माहिती नाही : पंकजा मुंडे



**केज :** वाल्मीक कराडवर मकोका कायद्याअंतर्गत कारवाई झाल्यानंतर परळीमध्ये जोरदार राडा झाल्याचे पाहायला मिळाले. वाल्मीक कराड समर्थकांकडून काल परळी बंदची हाक देण्यात आली होती. दरम्यान, आजही परळीतील व्यापाऱ्यांनी बेमुदत बंद पुकारला आहे. या घटनांवर आमदार पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली असून मला त्याबद्दल काही माहिती नसल्याचे त्या म्हणाल्या. बीडमधील तणावाबाबत गृहमंत्र्यांशी चर्चा करणार, असेही त्यांनी सांगितले. वाल्मीक कराडच्या समर्थनार्थ मंगळवारी आणि आज परळी तालुक्यात आंदोलन करण्यात आले. अनेक ठिकाणी वाल्मीक कराडचे समर्थक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. यामुळे परळीत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यावर पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली. मात्र, यावेळी त्यांनी अधिक बोलणे टाळले.

परळी सध्या बंद आहे, याबाबत पत्रकारांनी पंकजा मुंडे यांना विचारणा केली असता, सध्या परळीत काय सुरू आहे, याबाबत मला फारशी माहिती नसल्याचे त्या म्हणाल्या. मी माझ्या नियोजित कार्यक्रमात आहे. रोज सकाळी उठून रात्रीपर्यंत काम करत आहे. या गोष्टी आता माझ्यासाठी आत्ता मॅटर करत नाहीत. माझ्यासाठी रोजचे काम मॅटर करते, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

परळीमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून तणावपूर्ण वातावरण आहे, अशी विचारणा केली असता, तेथील तणाव करण्यासाठी मी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचे पंकजा मुंडे म्हणाल्या. तणाव कमी करण्यासाठी गृहमंत्रालयाला काय करता येईल, ते करावे, असेही त्या म्हणाल्या.




# धनंजय मुंडेंच्या टोळीने कोर्टा बाहेर गोंधळ घातला

**जालना :** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी तसेच मंत्री धनंजय मुंडेंच्या जवळचे असलेले वाल्मीक कराडला बीड कोर्टाने ७ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. त्यानंतर कोर्टाच्या बाहेर वाल्मीक कराड समर्थकांनी घोषणाबाजी करत आंदोलन केले. यावर मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया देत धनंजय मुंडेंवर निशाणा साधला आहे.

मनोज जरांगे पत्रकारांशी बोलताना म्हणाले, त्याच्यावर गुन्हा दाखल आहे आणि हा त्यांच्या घरी जाऊन भेटतो, मंत्री असून. या धनंजय मुंडेनेच त्याच्या टोळीला सांगितले असणार, ही जातीयवादी टोळी आहे, जातीय तेढ निर्माण करणारी टोळी आहे ही. बीडमध्ये कायदा सुव्यवस्था नीट ठेवायचा नाहीये या धनंजय मुंडेला. त्यानेच सांगितले वाटतं यांना गोंधळ घालायला म्हणून एवढा माज आला आहे यांना. मुख्यमंत्री साहेब थांबवा हे. गोरगरीब जनतेला त्रास नाही झाला पाहिजे याचा. यांचा माज उतरवायला मला पण वेळ लागणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, कोर्टा बाहेर जाऊन गोंधळ घालणार असतील आणि पोलिसांना सांगतात की पोलिसांनी आमच्यावर दादागिरी करू नये आम्ही हे सहन करणार नाही, ही भाषा आहे का धनंजय मुंडेच्या टोळीची? आता कुठे गेली तुमची संचारबंदी? या आरोपीला साथ कसे काय देऊ शकतात, त्याच्यामुळे यांना सुट्टी देऊ नका.

आज पंतप्रधान नरेंद्र मोदी मुंबईच्या दौऱ्यावर असताना मंत्री धनंजय मुंडे परळीमध्ये आहेत, त्यांना दूर ठेवले जात आहे का? असा प्रश्न विचारला तेव्हा मनोज जरांगे म्हणाले, हे काय जवळ करण्याच्या लायकीचे आहेत का? सामाजिक तेढ निर्माण करतात, सामाजिक सलोखा यांना ठेवायचा नाही, जिल्ह्याची शांतता भंग करायची आणि हे असले काय कामाचे? खुनातला, खंडणीमधला आरोपी त्याला पाठबळ देती धनंजय मुंडेची टोळी, हे असले काय जवळ करायचे. हे तर डाग आहेत, फडणवीस साहेबांच्या सरकारला डाग लावायला लागलेत हे.

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले, आपल्या माध्यमातून मी सांगतो मुख्यमंत्री साहेबांना आणि अजित पवारांनाही सांगतो, आज पहिल्यांदा त्यांचे नाव घेत आहे. जिल्ह्याची कायदा सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे. धनंजय मुंडेची गुंडची टोळी थांबवा. जर हे आरोपीच्या बाजूने आरडाओरडा करायला लागले तर आम्ही सुद्धा सहन करणार नाही. या धनंजय मुंडेला थांबवा. आमचे लेकरू गेले संतोष देशमुख, आनंद हिरावून घेतला यांनी सुखी कुटुंबाचा या धनंजय मुंडे आणि त्याच्या टोळीने. खून करतात, खंडणी मागतात यात आता एकाला सुद्धा सोडायचे नाही. यातला एक पण सुटला नाही पाहिजे.

धनंजय मुंडे परळीमध्ये येऊन वाल्मीकच्या कुटुंबीयांना भेटले. यावर देखील मनोज जरांगे पाटील यांनी टीका केली आहे. मनोज जरांगे म्हणाले, चांगले काम केले त्यांनी. मंत्रीपदाचा फायदा घेतो. संतोष भैय्याचे कुटुंब उद्ध्वस्त केले तुझ्या लोकांनी. संतोष भैय्याच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबियांच्या पाठीवरून हात फिरवायला तुला वेळ मिळाला नाही का? या सगळ्यामागे याचाच हात आहे का असा संशय आता आम्हाला येतोय, अशी शंका देखील मनोज जरांगे यांनी उपस्थित केली आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १६ जानेवारी २०२५

# प्रोफेसर डॉ. सुषमा शंकरराव प्रधान घेवंदे यांचा थायलंडचे साहित्य रत्न पुरस्काराने गौरव



**जालना :** थायलंड येथील बँकांक शहरात झालेल्या फुले- शाहू- आंबेडकरी पहिल्या विश्व साहित्य संमेलनात प्रोफेसर डॉ. सुषमा शंकरराव प्रधान-घेवंदे यांना साहित्यरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद औरंगाबाद, इंडियन असोसिएशन पटाया थायलंड आणि सोनवणे फाउंडेशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने, थायलंडची राजधानी बँकांक येथे पहिले फुले- शाहू- आंबेडकर विश्व साहित्य संमेलनाचे आयोजन ०७ ते १० जानेवारी २०२५ या कालावधीत करण्यात आले होते.

प्रो.डॉ. सुषमा शंकरराव प्रधान घेवंदे यांच्या या यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी आरोग्यमंत्री आदरणीय राजेशभैय्या टोपे, संस्थेच्या सचिव मनिषाताई टोपे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, सहप्रशासकीय अधिकारी राहुल भालेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शहाजीराव गायकवाड, उपप्राचार्य प्रा. ज्ञानेश्वर उबाळे, ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. शिवशंकर घुमरे मराठी विभाग प्रमुख डॉ. राम रौनेकर, ज्येष्ठ विचारवंत- साहित्यिक डॉ. ऋषिकेश कांबळे, डॉ. मोहन सौंदर्य डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. युवराज धबडगे, डॉ. सुरेश मगरे डॉ.राहुल मस्के, डॉ.अरुण कोळी, डॉ. अशोक घोळवे, डॉ. दिगंबर भुतेकर, डॉ. प्रशांत तौर, डॉ रवींद्र पाथरे, डॉ.दत्ता घोगरे, डॉ.विनोद जाधव, डॉ. रवींद्र पैठणे, प्रा. दीपक राखुंडे प्रा.लक्ष्मण गादगे, प्रा.शरद खोजे, प्रा. जानकी कुर्तडीकर यांच्यासह अनेकांनी अभिनंदन केले

# नामांतर लढा वेदनादायक - डॉ. बाळासाहेब लिहिणार




**छत्रपती संभाजीनगर :** राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ नामविस्तार दिनानिमित्त विशेष डॉ. बाळासाहेब लिहिणार यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते.

त्यावेळी ते बोलत होते की, स्वातंत्र्ययुक्त काळात महाराष्ट्राच्या इतिहासत मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार हा मोठया संघर्षाने झाला येथील दलित शोषित पीडित समाजाच्या संसाराची या काळात होळी झाली घरे दारे पेटवून माणूस या संकल्पनेलाच काळिमा फासल्या गेला. हा लढा खरे पाहता राजकीय लढा नसतानाही या लढ्याला राजकीय रूप देण्यात आले.

गौतम वाघमारे, पोचिराम कांबळे, चंदन कांबळे, सुहासणी बनसोडे अश्या कितीतरी जणांची हत्या झाली आणि असे होऊनही विद्यापीठाचा नामविस्तार झाला नामांतर झाले नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे यांनी महापुरुषांना जीवनभर संघर्ष करावा लागला आणि त्यांनंतरचा समाज त्याची फळे चाखू लागला असे सूचित करून अध्यक्ष समारोप केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. माठे यांनी केले तर प्रास्तविक डॉ. रमेश कचरे यांनी केले तर आभार प्रा. योगेश शिंदे यांनी मानले इतिहास आणि राज्यशास्त्र विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होतेइतिहास विभाग प्रमुख प्रा. मनोज देवकर यांनी या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमनिम डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, डॉ. नरेश डहाळे, डॉ. कालिदास दिनकर फड, डॉ. लक्ष्मण दांडगे, डॉ. जयश्री पाटील,प्रा. गणेश कुऱ्हाडे, प्रा. ज्ञानेश्वर लांडगे डॉ. सुखदेव पोटदुखे, प्रा. हरिदास होळकर, डॉ. पठाण,रमेश जाधव ज्ञानेश्वर जाधव, मधुकर राठोड, भगवंत देशपांडे,आदी उपस्थित होते.

# शिक्षणाचा भुलभुलैया



**प्रा.डॉ. सतीश मस्के**
**मो.९४२३३९७४८४**

काय घ्यावे शिक्षण
हल्ली पोरांनी आता
जिकडे तिकडे चोहिकडे
कमालीची उदासिनता

नाही नोकरी
शिक्षणात आता
बहुजनांचे खच्चीकरण
नुसता बोलबाला

म्हणे कौशल्याचे शिक्षण
सरकारची फसवाफसवी
बदलती शैक्षणिक धोरण
त्यात सुशिक्षिताचे मरण

हिंदुत्वाच्या गोळीने
साऱ्यांना गहाळ केले
शिक्षणाचे बाजारीकरण
चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा फास

दाबला गळा लोकशाहीचा
भ्रष्टाचारी लोकप्रतिनिधी बोलेना
नवीन शैक्षणिक धोरणात
बारा बलुतेदारीच्या खुणा

हल्ली शिक्षणाचा
नुसता भूलभुलैया
प्राध्यापक, कुलगुरू पदासाठी
आता पात्रताविना नोकरी

लाज वाटू द्या जरा
हे असे करणे खरे नाही
निवडून आलो ज्यांच्या जीवा
त्यांना मातीत गाडने बरे नाही.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार १६ जानेवारी २०२५


## थायलंडची राजधानी बँकॉक येथे विश्व साहित्य संमेलनामध्ये प्रो. डॉ. अरुण कोळी यांचा साहित्यरत्न पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद छत्रपती संभाजीनगर, इंडियन असोसिएशन पटाया थायलंड आणि सोनवणे फाउंडेशन नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने बैकॉंक येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषदेचे हे पहिले साहित्य संमेलन होते.

हे संमेलन दि.७ जाने. ते १० जाने. २०२५ या कालावधीत प्रोफेसर डॉ. ऋषिकेश कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. उदघाटक म्हणून प्रोफेसर फ्रापलाड हे उपस्थित होते. त्यांनी बुद्ध तत्वज्ञानावर भाष्य केले.

या संमेलनामध्ये माणसाला माणुस म्हणून जगू द्या अशी हाक देणाऱ्या डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे पाईक असणाऱ्या साहित्यिकांचा साहित्यरत्न पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला.

यामध्ये चेतना शिक्षण प्रसारक मंडळ वैजापूर संचलित कला वरिष्ठ महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्रो. डॉ. अरुण कोळी यांचाही साहित्यरत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

याप्रसंगी बापुसाहेब सोनवणे, प्रो. मोहन सौदर्य, प्रो.बाळासाहेब लिहीणार, प्रो. युवराज धबडगे, प्रो. शंकर वाघमारे, प्राचार्य भगवान कांबळे, प्राचार्य राहुल मस्के, प्राचार्य डॉ. प्रशांतकुमार वंनजे, प्राचार्य डॉ. हसन इनामदार, प्रो. कनकुटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मिळालेल्या आंतरराष्ट्रीय पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुभाष झांबड, उपाध्यक्षा सुशीलाताई वाठोरे, सचिव एकनाथ शिंदे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उषा बनसोडे, प्रो शैलेश राऊत, प्रो. सुखदेव इंघारे, प्रो विशाला शर्मा,प्रो अभिजित पिलखाने, प्रो. विनोद बैरागी, प्रो. भालचंद्र ठावरे, डॉ विवेक साठे डॉ धनंजय रायबोले, डॉ. युवराज आंधळे, डॉ. जिजा राऊत, डॉ. पांडुरंग कांबळे, डॉ सुर्या, डॉ. आकोलकर, श्री मनोज शिंदे, श्री राजू सनवणे, श्री परमेश्वर पैठणे, श्री संतोष सुर्यवंशी, श्री गणेश तांबे आदिनी अभिनंदन केले.

## कन्नड तालुक्यात बुधवारी फेरफार अदालतीचे आयोजन

**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड तालुक्यात दि. १५ जानेवारी रोजी महसूल विभागाच्या वतीने मंडळ निहाय फेरफार अदालतीचे आयोजन करण्यात आल्याची माहिती तहसीलदार विद्याचण कडवकर यांनी दिली आहे.

दि. १५ जानेवारी रोजी सकाळी १०:०० कन्नड तालुक्यातील करंजखेड, चापानेर, चिंचोली, येथील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी सजा कार्यालय) चिकलठाण ग्रामपंचायत कार्यालय, देवगाव रंगारी मंडळाधिकारी कार्यालय, नागद ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) कार्यालय, नाचणवेल ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) कार्यालय, पिशोर ग्रामपंचायत कार्यालय, हतनूर जूनी ग्रामपंचायत कार्यालय, कन्नड तहसील कार्यालय, येथे या अदालतींचे आयोजन करण्यात आले आहे.

या फेरफार अदालतींत तालुक्यातील सर्व शेतकरी, मजूर, दिव्यांग, सर्वसामान्य नागरिकांनी त्यांचे बोजा, विहिर, मालकी हक्काचे फेरफार प्रलंबित असतील तर त्यांनी आपले मंडळ अधिकारी यांच्या कडे कागदपत्रांसह लेखी अर्ज दाखल करावेत. सात बारा तील नाव, क्षेत्र, फेरफार दुरुस्ती करावयाची असेल तर अर्ज करावेत. तसेच ज्या नागरिकांना रेशन कार्डात नाव वाढविणे अथवा कमी करणे, शिधापत्रिका मागणी इ. साठी अर्ज करावेत. रस्त्या बाबत तक्रारी, स्मशानभूमी मागणी साठी ही अर्ज करता येईल.

तसेच कृषी विभाग, पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत अधिकारी संबंधित कामकाजा बाबत ही अर्ज करता येईल. गावांतील दिव्यांग, निराधार किंवा संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेण्यासाठी (१) दारिद्रय रेषे खालील प्रमाणपत्र, (२) ५० हजार पेक्षा कमी उत्पन्न असल्याचे प्रमाणपत्र, (३) विधवां साठी दारिद्य रेषा प्रमाणपत्र, (४) संजय गांधी, श्रावण बाळ योजनेसाठी २१ उत्पन्न प्रमाणपत्र, या कागदपत्रांसह अर्ज करावेत.

या अदालतींत मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, कृषी सहाय्यक, संबंधित विभागांचे अधिकारी, उपस्थित राहातील. तसेच कृषी विभाग, पंचायत समिती विभागातील तक्रारी स्विकारण्यात येतील असे अवाहन तहसीलदार विद्याचण कडवकर यांनी केले आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## सिद्धाप्पा बिराप्पा गाडेकर यांच्या मेहनतीचा शंभर वर्षांचा प्रवास..... होतकरू मेंढपाळाचा शताब्दी वाढदिवस कुटुंबीयांकडून उत्साहात साजरा







**मुरूम, ता. उमरगा, (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भुसणी, ता. उमरगा येथील सिद्धाप्पा बिराप्पा गाडेकर यांचा १०० वा वाढदिवस हडपसर (पुणे) येथे त्यांच्या कुटुंबीयांकडून नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. शंभर वर्षांचा इतिहास असलेल्या या मेंढपाळाने ६० वर्षे भुसणी परिसरात रानावनात फिरून ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता मेंढ्या राखण्याचे काम केले.

त्यांच्या जीवन प्रवासाने सर्वांना नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळते आहे. एका गरीब पण जिद्दी मेंढपाळाने आपल्या आयुष्याच्या १०० व्या वर्षात पदार्पण करताना आपल्या मेहनतीच्या आणि संघर्षमय जीवनाचा प्रवास उजळून टाकला. त्यांच्या शताब्दी वाढदिवसानिमित्त गाडेकर कुटुंबीयांकडून विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

संघर्षातून यशाकडे प्रवास. सिद्धाप्पा गाडेकर यांचा जन्म एका सामान्य कुटुंबात झाला. परिस्थिती अत्यंत बिकट होती, पण त्यांनी हार न मानता मेंढ्यांची देखभाल करत आणि त्यातून आपला उदरनिर्वाह करत आयुष्य घडवले. त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत स्वतः चे कुटुंब एकत्रित ठेवले आहे. आज जवळपास कुटुंबामध्ये शंभर सदस्य आहेत. अशी उदाहरणे दुर्मिळ आहेत.

सिद्धाप्पा गाडेकर उर्फ आप्पा हे गाव, तालुका व जिल्ह्यात सलग दहा वर्ष कुस्ती पैलवान म्हणून प्रसिद्ध होते. कुटुंबामध्ये अनेक जण उच्चशिक्षित असून विविध व्यवसायामध्ये काम करत आहेत. आपल्या कुटुंबाचा आधार बनण्याच्या जिद्दीने त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने गाव व परिसरातील अनेकांनी त्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या.

कुटुंबीयांनी केक कापून त्यांचा पुणेरी पगडी घालून यथोचित सत्कार केला आणि त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.यावेळी या कार्यक्रमास आलेल्या अनेकांनी बिरू गाडेकर हे आमच्या गावासाठी प्रेरणा स्थान आहेत. त्यांच्या जिद्दीमुळेच त्यांनी शंभर वर्षांचा प्रवास यशस्वी केला आहे.

उपस्थित मान्यवरांनी दिलेले कौतुकाचे शब्द निश्चितच गाडेकर यांचे जीवन हे येणाऱ्या पिढ्यांसाठी आदर्श आहे. त्यांनी गरिबीवर मात करत जिद्दीचे उदाहरण घालून दिले आहे. या सत्काराला विविध क्षेत्रातील लोक उपस्थित होते.